# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जळगाव दि.१७ (            ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जैवशास्त्र प्रशाळेतील डॉ.सतीष पाटील व संशोधक डॉ.किरण मराठे-अजनाडकर यांना भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्याकडून संशोधन प्रकल्पासाठी १९ लाख रुपये इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.

डॉ.पाटील आणि डॉ.मराठे यांनी हा संशोधन प्रकल्प आयसीएमआरला सादर केला होता.विविध आजारांच्या उपचारामध्ये अत्यंत महत्वाचे असणारे प्रतिजैवके (ॲटिबायोटिक्स), जगभर विविध जिवाणू/विषाणूमुळे होणाऱ्या आजारावर सध्याची प्रतिजैवके निष्प्रभ ठरत असल्याने या आजारांवर उपाय करणे कठीण जात आहे. जागतिक हवामानातील बदल, जंतूनाशकांचा अती वापर इ.कारणामुळे जिवाणूमध्ये प्रतिरोध तयार होत आहे, ही जागतिक आरोग्यासाठी धोक्याची घंटा आहे. त्यावर उपाय म्हणून नवीन अब्जांश तंत्रज्ञान (नॅनोटेक्टनॉलॉजी) आणि नैसर्गिक घटकांचा वापर करुन प्रतिजैवण योग्य प्रमाणात दिल्यास ॲटिबायोटिक्स रेझिस्टन्स दिल्यास हा प्रश्न सूटुन असाध्य आजारावर उपचार होऊ शकतो असे संशोधन प्रकल्पात नमूद केले होते. या संशोधनाचे महत्व लक्षात घेऊन तीन वर्षासाठी या संशोधकांना हा निधी मंजूर झाला आहे, अशी माहिती डॉ.सतिष पाटील यांनी दिली.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हयाच्या दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी